# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २४/०१/२०२५ (शुक्रवार) सायंकाळ**

---

### महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रम अंतर्गत संपूर्ण देशामध्ये लागू झालेल्या तीन नवीन कायद्याबाबत आयोजित करण्यात आले जनजागृती शिबिर

नागपुर ग्रामीण पोलीस विभागातर्फे महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रम अंतर्गत संपूर्ण देशामध्ये लागू झालेल्या तीन नवीन कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले असुन सदर मार्गदर्शन शिबीरामध्ये सामान्य जनतेपर्यंत १ जुलै २०२४ पासुन संपूर्ण देशामध्ये लागुन झालेल्या १. **भारतीय न्याय संहिता** , २. **भारतीय नागरिक सुरक्षा संहीता** ,३. **भारतीय साक्ष अधिनियम** या तीन नविन कायदयाबाबत जनजागृती करणे कामी खालील ठिकाणी शिबीर आयोजीत करून मार्गदर्शन करण्यात आले होते.

**उमरेड उपविभाग :—** दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी उमरेड उपविभाग अंतर्गत खालील ठिकाणी नविन कायदे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले आहे. सपोनि श्री रविंद्र मस्कर यांनी नवीन तीन कायद्याबाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच त्याठिकाणी १. **भारतीय न्याय संहिता** , २. **भारतीय नागरिक सुरक्षा संहीता** ,३. **भारतीय साक्ष अधिनियम या संबधीत व्हिडीओ सुध्दा दाखविण्यात आले आहे.**

१.**पोलीस स्टेशन भिवापुर येथे भिवापुर महाविदयालय भिवापुर येथे** तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये सामान्य नागरिक आणि जेष्ठ नागरीक ,पोलीस पाटील उपस्थित आणि अंगणवाडी सेविका होते. २.**पोलीस स्टेशन उमरेड** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये उमरेड येथील नागरिक,पोलीस पाटील आणि पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार उपस्थित होते.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर